# उमेदवारांना सुचना

'कनिष्ठ लिपीक' पदाच्या मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी दिलेल्या तारखेला वेळेवर मुलाखतीकरीता उपस्थित राहतांना स्वतः चे मुळ प्रवेशपत्र/हॉल तिकीट सोबत आणावे. तसेच खालील मुळ दस्तऐवज व त्यांचे साक्षांकित प्रती, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर येथे मुलाखतीच्या वेळेस पडताळणी करिता सादर करावी.

| | |
|---|---|
| ०१ | जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/माध्यमिक शाळा प्रमाणपत्र) |
| ०२ | माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| ०३ | माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका |
| ०४ | अर्हता परीक्षा / पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| ०५ | अर्हता परीक्षा / पदवी परीक्षा मध्ये मिळवलेल्या गुणांची गुणपत्रिका |
| ०६ | 'कनिष्ठ लिपीक' पदाकरीता आवश्यक असणारे शासनाद्वारे घेणात येणाऱ्या मराठी व इंग्रजी टंकलेखन उत्तीर्ण केल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र |
| ०७ | **दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेली चारित्र्य प्रमाणपत्रे**, त्यांचे नाव, पदनाम आणि पूर्ण टपाल पत्यासह, (जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस किंवा नंतर दिलेले, उमेदवाराचे नैतिक चारित्र्य चांगले असल्याचे प्रमाणित करणारे, जाहिराती बरोबर दिलेल्या विहित नमुन्यात दिलेली मुळ प्रत.) |
| ०८ | पात्रतेच्या निकषात नमुद केल्याप्रमाणे विद्यापीठ/संस्थेचे जारी केलेले संगणक संचालनातील विहित ज्ञानाविषयीचे अर्हता प्रमाणपत्र. |
| ०९ | शासनाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडून निर्गमित केलेला जातीचा दाखला व जात पडताळणी प्रमाणपत्र, जिथे लागू असेल तेथे. |
| १० | उमेदवार राज्य/केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधित विभागाकडून **'ना हरकत प्रमाणपत्र'**. |

..२/

| | |
|---|---|
| ११ | अनुभव प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे असल्यास. |
| १२ | विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदलले असेल तर तिचे नाव बदलण्यासंदर्भातील कागदपत्रे, जसे की, शासकीय राजपत्र/सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| १३ | छोटया लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र भरुन देणे.<br>(नमुना 'अ' हा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, लातूर यांचेकडे उपलब्ध आहे. तो साध्या कागदावर व कोणत्याही मुद्रांक शुल्काशिवाय उमेदवारानी कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी भरुन दयावा.) |

**जिल्हा न्यायालय, लातूर**

दिनांक : १८/११/२०२४.

DISTRICT AND SESSIONS COURT LATUR

**(व्ही. व्ही. पाटील)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर.